**09.01.2021** **प्रभात:मुरली** **मधुबन**
**ओम शांती**
**बापदादा**

"गोड मुलांनो,बेहद्दच्या पित्याची आठवण करणे,ही गुप्त गोष्ट आहे,आठवणी द्वारेच आठवण मिळते,जे आठवण करत नाहीत,त्यांना बाबा पण कसे आठवण करतील"

**प्रश्नः-** संगमयुगामध्ये मुलं कोणते शिक्षण घेता,जे संपूर्ण कल्पामध्ये शिकवले जात नाही?

**उत्तरः-** जीवंत पणे शरीरापासून अनासक्त म्हणजेच मृत होण्याचे शिक्षण आत्ताच शिकवतात,कारण तुम्हाला कर्मातीत बनायचे आहे. बाकी जोपर्यंत शरीरामध्ये आहे, तोपर्यंत कर्म तर करायचे आहेत. मन पण तेव्हाच अमन होऊ शकेल, जेव्हा शरीरच नसेल,म्हणून मन जिते जगजीत नाही परंतु माया जिते जगजीत आहे.

ओम शांती. बाबा सन्मुख मुलांना समजवतात,कारण हे तर मुलं समजवतात,बेसमजलाच शिकवले जाते.आता बेहद्दचे बाबा भगवान येतात,तर कोणाला शिकवत तर जरूर असतील ना?जरुर बिलकुल उच्च ते उच्च बेसमज असतील, त्यांनाच म्हटले जाते विनाश काळात विपरीत बुद्धी.विपरीत बुद्धी कसे झाले?८४ लाख योनी लिहिले आहे ना.तर बाबांना पण ८४ लाख जन्मा मध्ये घेऊन गेले आहेत.असे म्हणतात परमात्मा कुत्र्या, मांजरा, जीवजंतू, सर्वामध्ये आहेत.बाबांनी समजवले आहे,जेव्हा कोणी नवीन येतात,तर प्रथम त्यांना हद्दच्या आणि बेहद्द च्या पित्याचा परिचय द्यायला पाहिजे.हे बेहद्दचे मोठे बाबा आणि ते हद्दचे छोटे बाबा आहेत.बेहद्दचे पिता म्हणजे बेहद्दच्या आत्म्याचे पिता झाले ना.ते हद्दचे पिता म्हणजे जीव आत्म्याचे पिता झाले.हे ज्ञान सर्व एक सारखे धारण करू शकत नाहीत.कोणी १ % धारण करतात तर कोणी ९५ % धारण करतात. या तर समजून घेण्याच्या गोष्टी आहेत. सूर्यवंशी घराना असेल ना. यथा राजाराणी तथा प्रजा असेल. हे तर बुद्धीमध्ये येते ना.प्रजा मध्ये सर्व प्रकारचे मनुष्य असतात.प्रजा म्हणजे प्रजा.बाबा समजवतात हे शिक्षण आहे.आपल्या बुद्धीनुसार प्रत्येक जण शिकत आहेत. प्रत्येकाला आपापली भूमिका मिळाली आहे.ज्यांनी कल्पा पूर्वी जितके राजयोगाचे शिक्षण धारण केले, तेवढे आत्मा पण धारण करते.हे शिक्षण कधी लपून राहू शकत नाही.शिक्षणा नुसारच पद मिळते. बाबांनी समजवले आहे पुढे चालून परीक्षा तर होईलच.परीक्षे शिवाय परिवर्तन होऊ शकणार नाही.अंत काळात सर्वांना माहीत होईल.आता पण समजू शकतात कि आम्ही कोणत्या पदाचे लायक आहोत.जरी लज्जामुळे सर्वांच्या सोबत हात उठवतात, मनामध्ये समजतात की,आम्ही असे श्रेष्ठ कसे बनू शकतो.तर ते पण हात वरती करतात.समजून परत हात ऊठवणे हे पण अज्ञानच म्हणणार ना.खूप अज्ञान आहे. बाबा तर लगेच समजू शकतात.यापेक्षा तर त्या विद्यार्थ्यांमध्ये जास्त अक्कल असते.ते समजतात आम्ही शिष्यवृत्ती घेण्यालायक नाहीत. पास होऊ शकणार नाहीत. यापेक्षा तर ते अज्ञानी चांगले समजतात. शिक्षक शिकवत आहेत,त्याद्वारे आम्ही एवढे गुण घेऊ.असे थोडेच म्हणतील आम्ही चांगल्या मार्काने पास होऊ.तर हे सिध्द होते की,एवढे बुद्धीमध्ये ज्ञान बसत नाही,अभिमान खूप आहे.जेव्हा तुम्ही येथे हे लक्ष्मीनारायण बनण्यासाठी येतात, तर चलन पण खूप चांगली पाहिजे.बाबा म्हणतात काही तर विनाशकाले विपरीत बुद्धि आहेत, कारण कायदेशीर बाबांशी आठवण नाही, तर काय हाल होईल?उच्चपद मिळू शकणार नाही.

बाबा तुम्हा मुलांना समजवतात, विनाश काळात विपरीत बुद्धीचा अर्थ काय आहे,हे मुलं पूर्ण समजू शकत नाहीत.परत दुसरे काय समजतील?जे मुलं समजतात आम्ही शिवबाबाची मुलं आहोत,तेच, पूर्ण अर्थ समजू शकत नाहीत.बाबांची आठवण करणे ही तर गुप्त गोष्ट आहे.शिक्षण तर गुप्त होऊ शकत नाहीत.अभ्यासामध्ये पण क्रमानुसार आहेत.सर्व एकसारखे थोडेच शिकतील.बाबा समजतात, हे तर आत्ता लहान मुलं आहेत.अशा बेहद्दच्या पित्याला तीन- तीन, चार-चार महिने पण आठवण करत नाहीत.माहिती कसे होईल की,आठवण करतात,जेव्हा त्यांची चिट्टी येईल.परत त्या चिठ्ठीमध्ये सेवा समाचार पण येईल की, हे आत्मिक सेवा करत आहेत. पुरावा तर पाहिजे ना.असे तर देह अभिमानी असतात,ते कधी आठवण करत नाहीत,न सेवेचा पुरावा देतात.काही जण तर समाचार देतात, बाबा अमके अमके आले, त्यांना असे समजवले.तर बाबा समजतात, मुलगा जिवंत आहे, सेवा समाचार ठीक देत आहे. काहीजण तर तीन-चार महिने पत्र पण लिहीत नाहीत,कोणताच समाचार देत नाहीत,तर बाबा समजतात मृत झाला की,आजारी आहे?आजारी मनुष्य लिहू शकत नाहीत.हे पण कोणी लिहितात, आमची तब्येत ठीक नाही,म्हणून लिहू शकलो नाही.काही तर समाचार देत नाहीत,ना आजारी आहेत,अभिमन खूप आहे.परत बाबा पण कोणाची आठवण करतील? आठवणी द्वारेच आठवण येते.परंतु देह अभिमान आहे.बाबा समजवतात मला सर्वव्यापी म्हटल्यामुळे ८४ लाखापेक्षा पण जास्त योनी मध्ये घेऊन गेले आहेत. मनुष्यांना पत्थर बुद्धी म्हटले जाते. भगवंतासाठी तर म्हणतात दगडा मातीमध्ये विराजमान आहेत.तर ही बेहदची निंदा झाली ना,म्हणून बाबा म्हणतात माझी खूप निंदा करतात. आता तुम्ही क्रमानुसार समजले आहे.भक्तिमार्गामध्ये गायन करतात, तुम्ही याल तर आम्ही आपल्यावरती बळी जाऊ,तुम्हाला वारीस बनवू.असे वारीस बनतात,जे दगडा मातीमध्ये म्हणतात.खुप निंदा करतात, तेव्हा बाबा म्हणतात यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत...आता तुम्ही मुलं बाबांना जाणतात,तर बाबांची खूप महिमा करतात.कोणी महिमा तर काय कधी आठवणीचे दोन अक्षर पण देत नाहीत.देह अभिमानी बनले आहात.तुम्ही मुलं समजता आम्हाला बाबा भेटले आहेत, आमचे पिता आम्हाला शिकवत आहेत.भगवानुवाच आहे ना. मी तुम्हाला राजयोग शिकवतो.विश्वाची राजाई कशी प्राप्त होते,त्यासाठी राजयोग शिकत आहोत.आम्ही विश्वाची बादशाही घेण्यासाठी बेहद पित्याकडून शिकत आहोत.हा नशा राहील तरी पण खूशी होईल.जरी गीतेचा अभ्यास करतात,परंतु जसे साधारण पुस्तकासारखे वाचतात. कृष्ण भगवानुवाच,राजयोग शिकवतात बस.इतका बुद्धीचा बुद्धीचा योग किंवा खुशी राहत नाही.गीता वाचणारे किंवा ऐकणाऱ्यांना इतकी खुशी होत नाही.गीता वाचून पूर्ण केली आणि धंद्यामध्ये गेले,बस.तुमच्या बुद्धी मध्ये आहे,बेहद्दचे बाबा आम्हाला शिकवत आहेत. दुसऱ्या कुणाच्या बुद्धीमध्ये येणार नाही की, आम्हाला भगवान शिकवत आहेत.तर प्रथम कोणी पण आले,तर त्यांना दोन पित्याचा परिचय द्यायचा आहे.तुम्ही सांगा, भारत स्वर्ग होता,आत्ता नर्क आहे. असे तर कोणी म्हणू शकत नाही की,आम्ही सतयुगामध्ये पण आहोत आणि कलियुगामध्ये पण आहोत.कोणाला सुख मिळाले तर स्वर्गामध्ये आहेत,दु:ख मिळाले तर नरका मध्ये आहेत.असे अनेक जण म्हणतात,दु:खी मनुष्य नरकामध्ये आहेत.आम्ही तर खूप सुखामध्ये बसलो आहोत.महल माडी इत्यादी सर्वकाही आहे.बाहेरचे खूप सुख पाहतात ना.हे पण तुम्ही आत्ता समजता की,सतयुगी सुख तर येथे मिळू शकत नाही.असे पण नाही की,स्वर्णिम युगाला लोहयुग म्हणा किंवा लोहयुगाला स्वर्णिम युग म्हणा एकच गोष्ट आहे.असे समजणाऱ्यांना अज्ञानी म्हणतात. तर प्रथम बाबांचा परिचय यायचा आहे.बाबा तर स्वत:च आपली ओळख करून देतात,दुसरे तर कोणी जाणत नाहीत.ते म्हणतात परमात्मा सर्वव्यापी आहेत.आता तुम्ही चित्रांमध्ये दाखवतात,आत्मा आणि परमात्म्याचे रूप एकच आहे, ती पण आत्मा आहे परंतु त्यांना परमात्मा म्हटले जाते. बाबा सन्मुख समजवतात मी कसे येतो.सर्व आत्मा तेथे परमधाम मध्ये राहतात. या गोष्टी बाहेरचे कोणी समजू शकत

नाही.भाषा पण खुप सहज आहे. गीते मध्ये श्रीकृष्णाचे नाव लिहिले आहे.आत्ता कृष्ण तर गीता ऐकवत नाहीत,ते तर सर्वांना म्हणू शकत नाही की,माझीच आठवण करा.देहधारीच्या आठवणी द्वारे पाप नष्ट होत नाहीत.कृष्ण भगवानुवाच देहाचे सर्व संबंध त्याग करून माझी आठवण करा परंतु देहाचे संबध तर कृष्णाला पण आहेत आणि तो परत लहान मुलगा आहे.ही पण खूप मोठी चूक आहे. एका चुकीमुळे खूप फरक पडतो. परमात्मा तर सर्वव्यापी होऊ शकत नाहीत,ज्यांच्यासाठी म्हणतात सर्वांचे सद्गतीदाता आहेत,तर काय ते दुर्गतीला प्राप्त होतात. परमात्म्याची कधी दुर्गति होते का? या सर्व विचार सागर मंथन करण्याच्या गोष्टी आहेत.वेळ वाया घालवण्याची गोष्टच नाही. मनुष्य तर म्हणतात आम्हाला वेळ नाही. तुम्ही समजतात राजयोगाचा कोर्स करा,तर म्हणतात आम्हाला वेळ नाही.दोन दिवस येतील, परत चार दिवस येणार नाहीत, शिकणार नाहीत तर लक्ष्मीनारायण कसे बनू शकतील.मायेची खूपच ताकत आहे.बाबा समजवतात जो सेकंद पास झाला,जो मिनिट पास झाला, त्याची हुबेहूब पुनरावृत्ती होत राहते.अनेक वेळा पुनरावृत्ती झालेली आहे.आता तर बाबा ऐकवत आहेत.बाबा तर पुनर्जन्मा मध्ये येत नाहीत,तुलना केली जाते, पूर्णपणे जन्म मृत्यू मध्ये कोण येतात? आणि न येणारे कोण आहेत?फक्त एकच शिवपिता आहेत,जे पुनर्जन्मा मध्ये येत नाहीत.बाकी सर्व येतात म्हणून चित्रा मध्ये दाखवले आहे. ब्रह्मा आणि विष्णू दोघं जन्म मृत्यू मध्ये येतात. ब्रह्माच विष्णू आणि विष्णूच ब्रह्मा हे भूमिका करत,येत जात राहतात.अंत होऊ शकत नाहीत.हे चित्र पण परत पाहतील आणि समजतील.खूपच सहज समजण्याच्या गोष्टी आहेत. बुद्धीमध्ये यायला पाहिजे की, आम्हीच ब्राह्मण आहोत, परत आम्हीच क्षत्रिय, वैश्य,शूद्र,बनू. परत बाबा येतील,तर आम्हीच ब्राह्मण बनू.ही आठवण केली तरीही स्वदर्शन चक्रधारी झाले.अनेक आहेत ज्यांना आठवण येत नाही.तुम्ही ब्राह्मणच स्वदर्शन चक्रधारी आहात,देवता नाहीत.हे ज्ञान आहे की चक्र कसे फिरते.हे ज्ञान मिळाल्यानेच देवता बनतात.वास्तव मध्ये कोणत्याही मनुष्याला स्वदर्शन चक्रधारी म्हणू शकत नाही.मनुष्याची सृष्टी, मृत्यूलोक वेगळे आहे.जसे भारतवासींचे रिती-रिवाज वेगळे आहेत,सर्वांचे वेगवेगळे असतात. देवतांचे रिती-रिवाज वेगळे आहेत. मृत्यूलोकातील मनुष्यांचे रितीरिवाज वेगवेगळे आहेत. रात्रंदिवसा चा फरक आहे म्हणून सर्वजण म्हणतात,आम्ही पतित आहोत.हे भगवान, आम्हा सर्व पतित दुनियेत राहणाऱ्यांना पावन बनवा.तुमच्या बुध्दी मध्ये आहे की,पावन दुनिया आज पासून ५ हजार वर्षापुर्वी होती,ज्याला सतयुग म्हणले जाते.त्रेताला म्हणता येणार नाही.बाबांनी समजवले आहे,तो प्रथम दर्जा आहे,हा दुसरा दर्जा आहे.तर एक एक गोष्ट चांगल्या प्रकारे धारण करायला पाहिजे.जे कोणी येतील तर ऐकून आश्चर्य करतील.कोणी आश्र्चर्य करतात. परंतु त्यांना वेळ मिळत नाही,जे पुरुषार्थ करतील.परत ऐकतात पवित्र जरूर राहायचे आहे. हा काम विकार आहे,जो मनुष्यांना पतित बनवतो,त्याला जिंकल्यास तुम्ही जगतजीत बनाल.बाबा म्हणतात, काम विकारजीत, जगतजीत बनाल.मनुष्य परत म्हणतात मन जिंकल्याने जगजीत बनाल.मनाला वश करा,आता मन तर तेव्हाच अमन होईल जेव्हा शरीर नसेल.बाकी मन तर कधी अमन होऊ शकत नाही.कर्म करण्यासाठी देह तर मिळतोच, परत कर्मातीत अवस्था मध्ये कसे राहायचे? कर्मातीत व्यवस्था मृत व्यक्तीला म्हटले जाते. जिवंतपणे मृत, शरीरापेक्षा वेगळे.तुम्हालापण शरीरापासून अनासक्त बनण्याचे शिक्षण शिकवत आहेत.आत्मा शरीरापासून वेगळी आहे.आत्मा परमधामची राहणारी आहे.आत्मा शरीरांमध्ये येते तर त्यांना मनुष्य म्हटले जाते.शरीर कर्म करण्यासाठी मिळते, एक शरीर सुटले परत, दुसरे शरीर घ्यायचे आहे.शांत तर तेव्हाच राहू शकतात,जेव्हा कर्मच करायचे नसते.मुलवतन मध्ये कर्म नसते.सृष्टीचे चक्र येथेच फिरत राहते.बाबांना आणि सृष्टी चक्राला जाणने,यालाच ज्ञान म्हटले जाते.हे डोळे जोपर्यंत पतित विकारी आहेत, तोपर्यंत या डोळ्याने पवित्र गोष्ट पाहू शकत नाहीत म्हणून ज्ञानाचा तिसरा नेत्र पाहिजे.जेव्हा तुमची कर्मातित अवस्था होईल, म्हणजेच देवता

बनाल,परत या डोळ्याने देवतांना पाहू शकाल.बाकी या शरीराने,या डोळ्याने,कृष्णाला पाहू शकत नाहीत.बाकी साक्षात्कारा ने काही मिळते थोडेच.अल्प काळासाठी खुशी राहते,इच्छा पुर्ण होते. अविनाशी नाटकांमध्ये साक्षात्काराची नोंद आहे, याद्वारे काही च प्राप्ती होत नाही.अच्छा.

गोड गोड खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती, मातापिता बापदादाची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात.आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेणेसाठी मुख्य सारांश:-

(१) शरीरापेक्षा वेगळी आत्मा आहे, जिवंतपणी या शरीरांमध्ये राहत, जसे मृत आहे,या स्थितीच्या अभ्यासाद्वारे कर्मातीत अवस्था बनवायची आहे.

(२) सेवेचा पुरावा द्यायचा आहे.देहभानला सोडून आपला खराखुरा समाचार द्यायचा आहे. चांगल्या मार्कोने पास होण्यासाठी पुरुषार्थ करायचा आहे.

**वरदान:-** सर्व खाते आणि नाते एका बाबांशी ठेवणारे,दुहेरी हलके फरिश्ता भव.

दुहेरी हलके फरिश्ता बनण्यासाठी देहाच्या भाना पासून दूर राहा, कारण देह भान माती आहे.जर याचे ओझे आहे, तर भारी पणा आहे.फरिश्ता म्हणजे आपल्या देहाच्या सोबत पण सबंध नाही. बाबांनी दिलेले तन पण बाबांना दिले. आपली वस्तू दुसऱ्यांना दिली तर आपले नाते नष्ट होते.सर्व देवाण-घेवाण बाबांशी आहे,तर बाकी सर्व पाठीमागील खाते नष्ट नष्ट होते.असे संपूर्ण बेगर अनासक्तच दुहेरी हलके फरिश्ता आहेत.

**बोधवाक्य:-** आपल्या विशेषतेला प्रयोगामध्ये आणा,तर प्रत्येक पावला मध्ये प्रगतीचा अनुभव कराल.

||| ओम शांती |||

ओम शांती.